# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**थेट मुलाखत (Walk in Interview)**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना (**कोव्हिड-१९**) या संसर्गजन्य रोगाची परिस्थिती नियंत्रीत करणेकामी वैद्यकिय आरोग्य विभागात कंत्राटी पध्दतीने एकत्रीत ठोक मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता तातडीने खालिल प्रमाणे पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव | मासिक ठोक एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी (बी.ए.एम.एस.) | आवश्यकते प्रमाणे | मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस.पदवी आणि वैद्यकिय अधिकारी पदाचा २ वर्षे शासकिय/निमशासकीय/नामांकित रुग्णालयाचा अनुभव. | रुपये ६०,०००/- |
| २ | फार्मासिस्ट | ०८ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची फार्मासिस्ट पदवी आणि वैद्यकिय अधिकारी पदाचा २ वर्षे शासकिय/निमशासकीय/नामांकित रुग्णालयाचा अनुभव. | रुपये १७,०००/- |

याबाबतची जाहिरात भि.नि.श. मनपाच्या संकेतस्थळावर **(bncmc.gov.in)**प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज, स्वपरिचय पत्र, शैक्षणिक कागदपत्रे, मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड इ. कागदपत्रे (मुळ व छायांकित प्रती) यांसह बुधवार दि.२४/०६/२०२० रोजी वेळ सकाळी ११.३० वा.पर्यंत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, मुख्य प्रशासकिय इमारत दालन क्र.५०६, पाचवा मजला, काप आळी, भिवंडी, जि. ठाणे येथे थेट मुलाखतीकरिता उपस्थित रहावे.

**सर्वसाधारण अटि व शर्ती :-**

१. उपरोक्त पदांकरिता कालावधी ६ महिने असणार आहे. आवश्यकता भासल्यास पुढील मुदतवाढ कामाच्या गुणवत्तेनुसार देण्यात येईल.
२. वयोमर्यादा शासनाच्या नियमानुसार (शासकिय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत वयोमर्यादा शिथीलक्षम)
३. क्षेत्रिय स्तरावर सामाजिक बांधीलकीने काम करण्याची आवड असावी.
४. नेमणूकी संदर्भात निवड समितीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.
५. सदर नेमणुक संपुर्णपणे अस्थायी स्वरुपाची असुन कोणत्याही उमेदवारास सदर जाहिर सुचनेच्या अनुषंगाने सेवेत कायम/नियमित केले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र करुन घ्यावे लागेल.
६. नियुक्ती देणे/नाकारणे तसेच नमुद कालावधीचे आत कोणत्याही क्षणी सेवेतुन कमी करण्याबाबतचे अधिकार मा.आयुक्त सो. यांचेकडे राखुन ठेवलेले आहेत.
७. आपली नेमणुक ठोक वेतनावर ६ महिन्याच्या कालावधीकरीता अस्थायी स्वरुपाची असेल.

२२/०६/२०२०

मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने

उप-आयुक्त(मुख्यालय)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी